**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र. ७**
**सभावृत्तांत**

दिनांक :- ०३/१०/२०१८ वेळ :- दुपारी १२.:३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक ~~तहकुब~~ सभा बुधवार दिनांक ०३/१०/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.करुणा शेखर चिंचवडे - अध्यक्ष
२. मा.संगिता राजेंद्र भोंडवे
३. मा.नामदेव जनार्दन ढाके
४. मा.सुरेश शिवाजी भोईर
५. मा.अपर्णाताई निलेश डोके
६. मा.राजेंद्र तानाजी गावडे
७. मा.निता विलास पाडाळे
८. मा.बिभीषण चौधरी, नामनिर्देशीत सदस्य
९. मा.विठ्ठल भोईर , नामनिर्देशीत सदस्य

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.संदिप खोत – क्षेत्रीय अधिकारी, मा.रामदास तांबे, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग, मा.एकनाथ पाटील, कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.अकबर शेख, उपअभियंता, विदयुत विभाग, मा.सी.एन.धानोरकर, उपअभियंता स्थापत्य विभाग, मा.एच.पी.बन्सल, उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.राजेंद्र इंगळे, उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.भाऊसाहेब साबळे, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.राजेंद्र जावळे, उपअभियंता, जलनिसारण विभाग, मा.के.बी.पारोल, मुख्य आरोग्य निरिक्षक ब क्षेत्रीय कार्यालय, , श्री.किशोर ढगे, अतिक्रमण निरिक्षक, अतिक्रमण मुख्य कार्यालय, इत्यादी.

सर्वप्रथम मा.करुणा शेखर चिंचवडे अध्यक्षा यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

त्यानंतर मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने पुढे नमुद केल्याप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्रमांक ७ मोरया सोसायटी स.नं.११६/२ प्रेरणा शाळेच्या पाठीमागे या भागातील रहिवासाची अनेक दिवसांची मागणी असल्यामुळे व या भागात या राहणा-या लोकांचे लोकेशन माहित होण्याच्या दृष्टीकोनातून तसेच शासकीय कागद पत्रावर पत्ता लिहिण्यासाठी व शासकीय कामासाठी मोरया सोसायटी या नावाचा नामफलक असणे गरजेचे आहे. म्हणून या भागातील रहिवाशांनी सर्वांनी मिळून मिटींगमध्ये मोरया सोसायटी हे नांव देण्यात यावे अशी मागणीचे सही करुन निवेदन दिलेले आहे. सबब मोरया सोसायटी या नावाने नामफलक बसविण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.बिभीषण चौधरी यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. २४

दिनांक ०३/१०/२०१८

सुचक : मा.निता विलास पाडाळे

विषय क्र. १

विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

अनुमोदक: मा.संगिता राजेंद्र भोंडवे

संदर्भ :- मा.निता विलास पाडाळे यांचा दिनांक २/७/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २२ काळेवाडी मधील एम एम कॉलेज समोर मुख्य चौक आहे. त्या चौकाचे नांव छत्रपती शिवाजी महाराज चौक हया नावाने प्रभागांतर्गत सन २०१३-१४ मध्ये ठराव झालेला आहे. पण काळेवाडी भाग हा हयावेळी ब प्रभाग अंतर्गत आल्यामुळे हा ठराव करण्यात यावा. तरी हया एम एम कॉलेज समोर मुख्य चौकाचे नांव छत्रपती शिवाजी महाराज चौक असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. २५

दिनांक ०३/१०/२०१८

सुचक : मा.राजेंद्र तानाजी गावडे

विषय क्र. २

विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

अनुमोदक: मा.नामदेव ढाके

संदर्भ :-मा.सुरेश शिवाजी भोईर यांचा यांचा दिनांक १२/९/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

श्री.गजाननभाऊ द.चिंचवडे पोलीस फ्रेन्डस वेलफेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य या संस्थेचे संस्थापक / अध्यक्ष आहेत. तसेच ते चांगले समाजसेवक आहेत. त्यांचा पत्ता शोधण्यासाठी नागरीकांची गैरसोय होत असून, त्यांच्या नावाचे दिशादर्शक २ (दोन) फलक प्रभागातील महत्वाच्या ठिकाणी बसविण्याकामीचा प्रस्ताव मा. प्रभाग समितीपुढे आला असता, सदरचा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेत येत आहे..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला..

ठराव क्र. २६

दिनांक ०३/१०/२०१८

सुचक : मा.संगिता राजेंद्र भोंडवे

विषय क्र. ३

विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

अनुमोदक: मा.नामदेव जनार्दन ढाके

संदर्भ :-मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा यांचा दिनांक १०/९/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

आदर्शनगर किवळे येथे ३० वर्षापासून रहिवाशी असलेले व नेहमी समाजसेवेसाठी तत्पर असणारे सुनिल गणपत शिवणकर यांचे दिनांक १८/८/२०१८ रोजी आकस्मिक निधन झाले आहे येथील सर्व मंडळीच्या सकारात्मक विचाराने त्यांच्या स्मरणार्थ आदर्शनगर किवळे शेवटचा बस थांबा चौकाला कै.सुनिल गणपत शिवणकर यांचे नांव देण्याकामीचा प्रस्ताव मा.प्रभाग समितीपुढे मान्यतेकामी आला असता, सदरचा विषय तहकुब ठेवणेत येत आहे असे ठरले...

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. २७ विषय क्र. ४

दिनांक ०३/१०/२०१८ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.सुरेश शिवाजी भोईर अनुमोदक: मा.राजेंद्र तानाजी गावडे

संदर्भ :-मा.सुरेश शिवाजी भोईर यांचा यांचा दिनांक १५/९/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

माणिक कॉलनीमधील सर्व्हे नं.२७८ येथील जागा ही भोईर परिवाराची होती सदर जागेत महानगरपालिकेचे उदयान असून महापालिकेने जागा ताब्यात घेतली आहे. सदर जागेत उदयान असून तेथील उदयानाला स्व: बाळासाहेब दिनकर भोईर उदयान असे नामकरण करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्र. २८ विषय क्र. ५

दिनांक ०३/१०/२०१८ विभाग - प्रशासन ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.नामदेव ढाके अनुमोदक: मा.राजेंद्र तानाजी गावडे

संदर्भ :- बक्षे/प्रशा/३/कावि/१७२/२०१८ दिनांक २६/९/२०१८ रोजीचा मा.क्षेत्रीय अधिकारी यांचा प्रस्ताव .

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेया कार्यक्षेत्रातील सर्व प्रभाग कार्यक्षेत्रातील हॉकर्स झोन पुन:स्थापीत करणेकामी मा.आयुक्त यांनी दिनांक २७/३/२०१८ रोजीच्या शहर फेरीवाला समिती सभेत दिलेल्या सुचनेनुसार ब प्रभागासाठी प्रभाग स्तरावर फेरीवाला उपसमिती गठण करण्यात आले असून, त्यात मा.क्षेत्रीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र व राज्यशासन तसेच मनपाने तयार केलेल्या धोरणानुसार ब क्षेत्रीय कार्यक्षेत्रात हॉकर्स झोन उपसमिती मार्फत दिनांक २१/९/२०१८ रोजी कार्यक्षेत्राची पाहणी करून हॉकर्स झोन स्थळांची निश्चीत करणेबाबत आवश्यक ती कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे. उपसमितीने सोबत जोडणेत आलेले प्रपत्र नमुद केलेले स्थळाची निश्चिती योग्य आहे असे मान्य केलेले आहे निश्चित करणेत आलेल्या हॉकर्स झोन स्थळाची प्रपत्राप्रमाणेच्या प्रस्ताचा विषय मा.प्रभाग समितीपुढे आला असता, मा.नगरसदस्यांनी हॉकर्स झोनच्या जागा पहाणी करून निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. २९

दिनांक ०३/१०/२०१८

सुचक : मा.नामदेव ढाके

विषय क्र. ६

विभाग - प्रशासन ब क्षेत्रीय कार्यालय

अनुमोदक: मा.राजेंद्र तानाजी गावडे

संदर्भ :- बक्षे/२/कावि/१६५/२०१८ दिनांक २५/९/२०१८ रोजीचा मा.क्षेत्रीय अधिकारी यांचा प्रस्ताव .

क्षेत्रीय कार्यालयामार्फत मा.प्रभाग समिती स्वीकृत सदस्यांना आयडेन्टी कॉर्ड, व्हीजीटींग कार्ड, शिफारस पत्र, लेटर पॅड इत्यादी सुविधा उपलब्ध करुन दयावयाच्या झाल्यास याकामी मा.प्रभाग समितीची मान्यता घेवून या विभागास सत्वर कळविण्यात यावे जेणेकरुन त्यानुसार मा.विधी समितीमार्फत मा.महापालिका सभेच्या मान्यतेने धोरण निश्चीत करणेकामी पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल असे कळविण्यात आलेले आहे.

तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत मा.प्रभाग समिती स्वीकृत सदस्यांना आयडेन्टी कॉर्ड, व्हीजीटींग कार्ड, शिफारस पत्र, लेटर पॅड इत्यादी सुविधा उपलब्ध करुन दयावयाच्या झाल्यास, मा.प्रभाग समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.तसेच मा.विधी समितीमार्फत मा.महापालिका सभेच्या मान्यतेने धोरण निश्चीत करणे आवश्यक आहे. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला..

ठराव क्र. ३०

दिनांक ०३/१०/२०१८

सुचक : मा.नामदेव ढाके

विषय क्र. ७

विभाग - प्रशासन ब क्षेत्रीय कार्यालय

अनुमोदक: मा.निता पाडाळे

संदर्भ :- मा.बिभीषण बाबु चौधरी यांचा दिनांक ३/१०/२०१८ रोजीचा प्रस्ताव .

मोरया सोसायटी स.नं.११६/२ प्रेरणा शाळेच्या पाठीमागे या भागातील रहिवासाची अनेक दिवसांची मागणी असल्यामुळे व या भागात या राहणा-या लोकांचे लोकेशन माहित होण्याच्या दृष्टीकोनातून तसेच शासकीय कागद पत्रावर पत्ता लिहिण्यासाठी व शासकीय कामासाठी मोरया सोसायटी या नावाचा नामफलक असणे गरजेचे आहे. म्हणून या भागातील रहिवाशांनी सर्वांनी मिळून मिटींगमध्ये मोरया सोसायटी हे नांव देण्यात यावे अशी मागणीचे सही करुन निवेदन दिलेले आहे. सबब मोरया सोसायटी या नावाने नामफलक बसविण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला..

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा.करुणा शेखर चिंचवडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[करुणा शेखर चिंचवडे]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/१८२/२०१८.
दिनांक : ९ / ११ /२०१८

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना